नि.फौ.ख.क्र.१२६ /२०२०
सरकार वि. अतुल
नि.क्र.३५

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–विठ्ठल नामदेव कोल्हे
वय:–५२ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.मानोली, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

१. दि.०३/०७/२०२० रोजी पोलिसांनी मला मानोली शिवारात बोलाविले होते. माझ्यासमक्ष पोलिसांनी काहीही केले नाही. पोलिसांनी माझ्यासमक्ष काहीही कारवाई केली नाही व पंचनामा केला नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.३६** देण्यात आला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखतो. आरोपी माझ्या गावाचे रहिवासी आहे.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०७/२०२० रोजी पोलिसांनी मला पंचनाम्याकामी हजर राहण्यासाठी समन्सपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला बोलाविले नव्हते आम्ही तेथुन जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला कु–हाडीने व कु–हाडीच्या दांड्याने मारहाण केल्याचा पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला होता मला वाचुन दाखविला त्यातील मजकुर खरा व बरोबर बसल्याची खात्री करून मी त्यावर सही केली होती. मी रामचंद्र कोल्हे याला ओळखतो. हे मला माहीत नाही की, तो घटनास्थळावर पंचनामाकामी हजर होता किंवा कसे. माझे घटनास्थळावर फोटो काढले नव्हते. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे त्याला यापुर्वीच आर्टीकल अ देण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.आर.बी.भोंबे यांच्यामार्फत सुरू.**

३. आर्टीकल अ वरील फोटो कोठे काढला कोणी काढला याबाबत मला माहीत नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२४.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड